# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 18 February 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प प्रगती आणि विकासाची नवी दालनं खुली करून देणारा असल्याचं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचं प्रतिपादन.
- सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता.
- राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार ज्येष्ठ कीर्तनकार ज्ञानेश्वर माऊली परदेशी यांना जाहीर.

आणि

- छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त उद्या सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन.

****

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेशी असून महाराष्ट्रासह देशाच्या प्रगतीची आणि विकासाची नवी दालनं खुली करून देणारा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सर्वसमावेशी आणि दूरदर्शी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे जाधव यांनी यावेळी आभार व्यक्त केले. भारतात लवकरच स्तनांच्या कर्करोगावर लस उपलब्ध होणार असल्याची माहिती जाधव यांनी दिली. यासंदर्भातली चाचणी प्रक्रिया सुरू असल्याची माहिती जाधव यांनी दिली.

****

केंद्र सरकारने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या केलेल्या नियुक्तीवर लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी

निवडणूक आयोगाचे विद्यमान सदस्य ज्ञानेश कुमार यांची नेमणूक झाल्याचं केंद्रीय विधी मंत्रालयाने काल जाहीर केलं, निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेलं असताना, अशी नियुक्ती जाहीर करणं, ही बाब अशोभनीय असल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.
दरम्यान मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीविषयी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालय उद्या तातडीनं सुनावणी घेणार आहे.

****

छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडिया या संकेतस्थळावरचा आक्षेपार्ह मजकूर हटवण्याबाबत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सायबर विभागाच्या महासंचालकांना सूचना केली आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते, सोशल मीडियाला भौगोलीक सीमा नसल्याने त्याच्या नियमनात अडचणी येतात, तरीही अशा प्रकारे चुकीची माहिती प्रसिद्ध होऊ नये, यासाठी कायदा करण्याबाबत केंद्र सरकारसोबत चर्चा करणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले...

***या संदर्भात महाराष्ट्राचे जे सायबर विभागाचे प्रमुख आहेत यांना मी सांगितलं आहे की त्यांनी तात्काळ विकिपीडिया किंवा त्याच्याशी संबधित जी यंत्रणा आहे. त्यांच्याशी बोलणी करावी आणि त्यांना ते हटवून देण्याकरता त्याठिकाणी सांगावं. या दृष्टीने सगळी कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. हा एक ओपन सोर्स प्लॅटफॉर्म आहे. त्याचे काही नियम आहे.त्या नियमानुसार त्याच्यामध्ये कोण लिहु शकतं याचे एडिटोरियल राईट काही लोकांना असतात. त्यामुळे अशा प्रकारे ज्या ऐतिहासीक गोष्टी आहेत, त्या गोष्टीचं असं तोडून मरोडून किंवा चुकीच्या पद्धतीने लिहिणं हे योग्य नाही.यासंदर्भात तुम्ही काहीतरी नियमावली तयार करा.***

****

सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची ऊर्जा कार्यक्षमता वाढवणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी १ हजार ५९४ कोटींच्या खर्चाला मान्यता, राज्यातील रोपवेच्या कामांसाठी राष्ट्रीय राजमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेडला आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता, जळगांव जिल्ह्यामधील चाळीसगांव तालुक्यातील वरखेडे लोंढे

मध्यम प्रकल्पाच्या १ हजार २७५ कोटी ७८ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता, आदी निर्णयही या बैठकीत घेण्यात आले.

****

मोठ्या शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी भविष्यात "उन्नत पॉडकार" वाहतूक सेवा महत्त्वाची भूमिका पार पाडेल, असा विश्वास राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे. गुजरातमध्ये वडोदरा इथल्या जगातील पहिल्या व्यावसायिक पॉडकार प्रणालीच्या कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर, राज्यात असा प्रकल्प उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला, ते म्हणाले..

***गुजरात प्रमाणे महाराष्ट्रामध्ये सुद्धा आता बस पोर्ट निर्मिती होईल.याची खात्री मी या राज्याचा परिवहन मंत्री या नात्याने देत आहे. त्याच बरोबर बडोदरा येथे पंधरा एप्रिलला माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि गडकरी साहेबांच्या हस्ते एक पॉड टॅक्सीचं उद्घाटन होणार आहे. एक किलोमीटरचा ट्रॅक त्यांनी त्याठिकाणी निर्माण केला आहे. एमएमआर क्षेत्रामध्ये जी वाढती लोकसंख्या आहे, त्याला जर कुठे आळा घालायचा असेल आणि जमिनीवरची वाहतूक जर तुम्हाला कमी करायची असेल तर हवेतील वाहतुकीशिवाय पर्याय नाही. म्हणून पॉड टॅक्सीचा सुद्धा पर्याय आपण एमएमआर क्षेत्रामध्ये राबवतोय.***

****

राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारी पासून सुरू होणार आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागात या परीक्षांबाबत नियोजन सुरू झालं आहे. यंदा छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड मधून १ लाख ८८ हजार, ७७७ विद्यार्थी परीक्षा देणार असून, ६६४ परीक्षा केंद्रं असणार आहेत. विभागात कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार असून, कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा, विभागीय मंडळाच्या सचिव वैशाली जमादार यांनी दिला आहे.

****

वारकरी संप्रदाय आणि संत सेवेत अतुलनीय योगदान दिल्याबद्दल जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव इथले ज्येष्ठ कीर्तनकार हरी भक्त परायण ज्ञानेश्वर माऊली परदेशी यांना यावर्षीचा, राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील स्मृती

संत सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १७ मार्चला लोणी बुद्रूक इथं या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. मानपत्र, स्मृती चिन्ह आणि २५ हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उद्या साजरी होत आहे, त्यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पुण्यात महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीनं आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या होणार आहे.

शिवजयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वराज्य सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या सप्ताहादरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत.

****

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे शिवरायांची भव्यदिव्य अशी प्रतिकृती साकारली. ९९५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

नांदेड इथं उद्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने "जय शिवाजी- जय भारत पदयात्रा" काढण्यात येणार आहे. शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून या पदयात्रेला सुरुवात होणार आहे.

लातूर इथंही उद्या 'जय शिवाजी, जय भारत पदयात्रा' आयोजित करण्यात आली आहे. या पदयात्रेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे.

अहिल्या नगर जिल्ह्यातील लोणी इथं शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आलं. याशिवाय मोटरसायकल रॅली, शिवज्योत, भव्य पालखी मिरवणूक आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्रांती चौक परिसरात शिवोत्सव सुरु असून, आज यात ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि महाराष्ट्र शासनाच्या दुर्ग संवर्धन समितीचे मुख्य मार्गदर्शक पांडुरंग बलकवडे यांचं 'शिवरायांची अष्टक्रांती' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

दरम्यान, शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगरातील प्रमुख ५ मार्ग उद्या बंद असणार आहेत. नागरिकांनी याची नोंद घेण्याचं आवाहन पोलिस प्रशासनानं केलं आहे.

****

भारतीय नौदलाच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारी, आयएनएस गुलदार ही युद्धनौका, लवकरच सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजयदुर्ग बंदरात स्थिरावणार आहे. ही नौका पर्यटकांसाठी खुली असेल, यामुळे सिंधुदुर्गातल्या पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

****

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत आयोजित करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथले साहित्यिक विष्णू सुरासे यांनी, या संमेलनाबाबत आपली भावना या शब्दांत व्यक्त केली...

***मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे एक मोठं चैतन्य साहित्यिकांमध्ये, लेखकांमध्ये निर्माण झालेलं आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मला कवी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. मी माझ्या काही अत्यंत कसदार अशा रचना या कवी संमेलनामध्ये सादर करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा आपली मराठी भाषा, आपलं मराठी साहित्य हे अधिकाधिक लोकांपर्यंत जावं हा एक या साहित्य संमेलनाच्या दृष्टीने प्रयत्न आहे.***

****

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी सरचिटणीस मधुकर अण्णा मुळे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज सायंकाळी छत्रपती संभाजीनगर इथल्या अयोध्यानगरी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

बीडचे पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांनी आज रेकॉर्डवरील गुन्हेगारांशी संवाद साधला. स्वतःमध्ये बदल करून स्वतःचं आणि कुटुंबियांचं जीवन व्यवस्थित करण्याचा सल्ला त्यांनी दिला. यापुढे गुन्हे केल्यास कडक कारवाईचा इशारा त्यांनी दिला.

****

नांदेड जिल्ह्यात २ मार्चच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी आणि जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे, जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी हा आदेश दिला आहे.

****